# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १९६ वा ❑ रविवार दि.२१ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## भारत नेपाळ संबंध पूर्व पदावर येथील का?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

नेपाळमध्ये झालेल्या तीव्र निदर्शनांनंतर आणि हिंसाचारानंतर आता शांतता प्रस्थापित होत आहे. देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान सुशीला कार्की यांनी पदभार स्वीकारला आहे.नेपाळमधील झेन–जी चळवळीनंतर आता अंतरिम सरकार स्थापन झाले आहे. पंतप्रधान मोदींनी माजी मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की यांना अंतरिम पंतप्रधान झाल्याबद्दल अभिनंदन केले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील एका पोस्टमध्ये पंतप्रधान मोदींनी सुशीला कार्की यांचे अभिनंदन केले आहे.नेपाळमध्ये ५ मार्च २०२६ रोजी सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीनंतर नेपाळला अंतरिम सरकारऐवजी नवीन सरकार मिळेल. नेपाळच्या अंतरिम पंतप्रधान म्हणून शपथ घेतल्यानंतर त्या देशाच्या पहिल्या महिला प्रमुख म्हणून उदयास आल्या आहेत. भ्रष्टाचारमुक्त सरकार हव्या असलेल्या लोकांसाठी सुशीला कार्की यांचे आगमन आशेचा किरण म्हणून उदयास आल्याचे मानले जाते.नेपाळमध्ये नवीन सरकार, भारताशी संबंध कसे असतील?

सुशीला कार्की यांची नियुक्ती नेपाळसाठी एक नवीन युग आणू शकते. भारतासोबतचे त्यांचे वैयक्तिक आणि सांस्कृतिक संबंध संबंध मजबूत करण्यास मदत करतील. पंतप्रधान मोदींना भेटण्याची शक्यता त्या उत्सुक आहेत. नेपाळमधील बदलाच्या या काळात, कार्की यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही देशांमधील सहकार्य वाढण्याची अपेक्षा आहे.

भारताचा पाठिंबा कायम राहील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. विशेषतः आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात भारताकडून त्यांनी अप्रत्यक्षरित्या मदतीची अपेक्षा व्यक्त केली.नेपाळमधील राजकीय अस्थिरतेनंतर त्यांची भूमिका महत्त्वाची आहे, जी दोन्ही देशांमधील संबंधांना एक नवीन दिशा देऊ शकते.ओली यांच्या कार्यकाळात भारत नेपाळ संबंध बिघडले होते. कार्की भारत नेपाळ संबंध पूर्वपदावर आणतील का?

ओली आणि प्रचंड दोघेही चीनचे जवळचे मानले जातात. ओली यांचा पंतप्रधान म्हणून मागील कार्यकाळ चीनच्या बाजूने झुकलेलाहोता. पक्षपातीपणा दाखवणारे आणि भारतविरोधी भावना भडकवणारे निर्णय आणि विधाने यासाठी ओली ओळखला जात होते

विशेष म्हणजे नेपाळमधील निवडणूक निकालांचा संदेश पाहिला तर हे देखील स्पष्ट होते की भारतविरोधी भावना बहुमत मिळवू शकत नाहीत, सर्वात मोठ्या पक्षाचा दर्जा तर सोडाच. त्यामुळे, काही निरीक्षकांना भीती वाटत असली तरी, आतापासून असे गृहीत धरण्याची गरज नाही की नवीन सरकार जुन्या चालीरीती आणि धोरणांचे पालन करेल. परंतु भारत आणि चीनमधील सध्याची समीकरणे पाहता, या आघाडीवर कोणतीही निष्काळजीपणा बाळगता येणार नाही. अशा परिस्थितीत, भारताला उदारमतवादी, चांगला शेजारी आणि जवळचा मित्र म्हणून आपली भूमिका चालू ठेवताना सावधगिरी बाळगावी लागेल.

भारताशी खोलवरचे नाते असलेले कार्की यांनी अलिकडच्याच एका मुलाखतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारताशी असलेल्या त्यांच्या नात्याबद्दल उघडपणे सांगितले. न्यूज१८ ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी म्हटले की भारत त्यांच्यासाठी सांस्कृतिक भाऊ आणि बहिणीसारखा आहे.

सुशीला कार्की यांना भारताबद्दल खूप प्रेम आहे. त्यांनी उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठातून () पदव्युत्तर शिक्षण घेतले. ''मला अजूनही माझे शिक्षक, मित्र आठवतात. वसतिगृह गंगा नदीजवळ होते आणि आम्ही उन्हाळ्यात रात्री छतावर झोपायचो,'' असे गंगेच्या काठावरील वसतिगृहातील दिवस आठवत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे मूळ गाव विराटनगर हे भारतीय सीमेपासून फक्त २५ मैल अंतरावर आहे. कार्की म्हणाल्या की त्या अनेकदा सीमेवरील बाजारात खरेदीसाठी जात असे. लाखो नेपाळी नागरिकांप्रमाणे, त्यांचेही भारतात नातेवाईक आणि ओळखीचे लोक आहेत. ही सांस्कृतिक जवळीक नेपाळ–भारत संबंधांच्या बळकटीचे प्रतीक आहे.

भारत आणि नेपाळमध्ये फार पुरातन संबंध आहेत. परंतु असे असूनही, दोन्ही देशांमध्ये वेळोवेळी सीमांवरून वाद निर्माण झाले आहेत. सर्वात मोठा आणि जुना वाद लिपुलेख, लिंपियाधुरा आणि कलापाणी क्षेत्रांशी संबंधित आहे, ज्याबाबत नेपाळच्या संसदेने २०२० मध्ये एक नवीन राजकीय नकाशा जारी केला होता. तत्कालीन पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी या मुद्द्यावर खूप आक्रमक भूमिका घेतली होती. भारताच्या आक्षेपाला न जुमानता, ओली सरकारने संसदेतून एक दुरुस्ती मंजूर केली आणि नवीन नकाशाला अधिकृतपणे मान्यता दिली, ज्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला.

लिपुलेख खिंड हा भारत, नेपाळ आणि चीनच्या त्रिकोणी सीमेवर स्थित आहे. हा भाग धोरणात्मक दृष्टिकोनातून खूप महत्त्वाचा आहे, कारण तो भारताला कैलास मानसरोवर आणि तिबेटशी जोडतो. भारत म्हणतो की नेपाळची सीमा काली नदीच्या पूर्व किनाऱ्यापासून सुरू होते, तर नेपाळचा दावा आहे की काली नदी लिंपियाधुरा येथून उगम पावते, त्यानुसार लिपुलेख आणि कलापाणी त्याच्या भागात येतात.

२०१५ मध्ये, भारताने लिपुलेख मार्गे कैलास मानसरोवर यात्रेला प्रोत्साहन देण्यासाठी चीनसोबत करार केला होता. नेपाळने यावर आक्षेप घेतला आणि तेव्हापासून हा वाद पुन्हा निर्माण झाला आहे. २०१९ मध्ये, भारत सरकारने जम्मू–काश्मीर आणि लडाखचे नवीन नकाशे जारी केले, ज्यामध्ये कलापाणी प्रदेश भारतीय सीमेत दाखवण्यात आला होता. यानंतर, ओली सरकारने नवीन नकाशा जारी करून वाद आणखी वाढवला.

काली नदीच्या उगमस्थानाबाबत वाद

भारत–नेपाळ सीमा १,८०० किमी लांबीची आहे आणि बहुतेक ठिकाणी स्पष्टपणे सीमांकित केलेली आहे. परंतु काली नदीच्या उगमस्थानाबाबत दोन्ही देशांमध्ये मतभेद आहेत. १८१६ च्या सुगौली करारात असे म्हटले होते की काली नदीच्या पश्चिमेकडील भाग भारताचा (तत्कालीन ब्रिटिश राजवटीचा) असेल आणि त्याच्या पूर्वेकडील भाग नेपाळचा असेल. वाद काली नदीचा खरा उगम कुठे आहे याबद्दल आहे. भारत तिला एक प्रवाह मानतो तर नेपाळ लिंपियाधुराला त्याचा उगम मानतो. यामुळेच कालापानी, लिपुलेख आणि लिंपियाधुरा हे तिन्ही क्षेत्र वादाचे मूळ बनतात.

माजी पंतप्रधान केपी ओली यांच्या कार्यकाळात हा वाद शिगेला पोहोचला. त्यांनी तो नेपाळच्या राष्ट्रीय अस्मितेशी जोडला. नेपाळी संसदेत एकमताने नवीन नकाशा मंजूर करून त्यांनी थेट भारताला आव्हान दिले. ओली यांनी भारतावर अनेक वेळा नेपाळी भूभाग ताब्यात घेतल्याचा आरोपही केला. या भूमिकेकडे नेपाळमधील राष्ट्रवादाचा फायदा घेण्याचा प्रयत्न म्हणूनही पाहिले जात होते. परंतु या आक्रमकतेचा परिणाम असा झाला की भारत आणि नेपाळमधील पारंपारिक संबंध बिघडले आणि दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंध थंडावले.

आता नेपाळची सूत्रे पंतप्रधान सुशीला कार्की यांच्या हाती आली आहेत, तेव्हा त्यांच्यासमोर आव्हान आहे की त्या या वादाला कसे हाताळतात. कार्की नेपाळच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या आहेत आणि त्यांची प्रतिमा संतुलित नेत्या आणि संस्थात्मक सुधारणांच्या समर्थकाची झाली आहे. अशी अपेक्षा आहे की ओलींप्रमाणेच कार्कीही संघर्षाच्या मार्गावर जाण्याऐवजी संवाद आणि राजनयिकतेवर भर देतील.

# अंबडमध्ये संत बहिणाबाईंच्या साहित्यावर २३ सप्टेंबरला राज्यस्तरीय चर्चासत्र

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – त्रैमासिक तिफण, संत तुकाराम अध्यासन केंद्र, शिवाजी महाविद्यालय कन्नड, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, मराठी विभाग मत्स्योदरी महाविद्यलय अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या शिष्या संत बहिणाबाई यांच्या साहित्यावर आधारित एक दिवशीय चर्चासत्राच आयोजन मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य विज्ञान महाविद्यालय अंबड येथे करण्यात आले आहे. मंगळवार, २३ सप्टेंबर रोजी चर्चासत्र होणार आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन राज्याचे माजी मंत्री आणि मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रमुख राजेश टोपे यांच्या हस्ते होणार आहे. संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सतीश बडवे यांचे बीज भाषण असणार आहे, तर शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंग पवार हे चर्चासत्राचे अध्यक्ष असणार आहेत. भाषा, साहित्य, संस्कृती संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, डॉ. रवींद्र पाथरे, राहुल भालेकर , प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. दिवसभर चालणाऱ्या या चर्चासत्रामध्ये संत बहिणाबाईंच्या साहित्यावर चर्चा होणार आहे. त्यामध्ये डॉ. अशोक देशमाने यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या चर्चेत डॉ. राजेंद्र चौधरी, डॉ. प्रमोद कुमावत, ह. भ. प. विवेकानंद शास्त्री, डॉ. रेखा ढेरे, डॉ. बालासाहेब कटारे हे सहभागी होणार आहे. प्रा. बसवराज कोरे यांच्या अध्यक्षतेखाली शोध निबंध वाचन होणार आहे. मान्यवर अभ्यासक सहभागी होतील. कार्यक्रमामध्येच डॉ. दत्तात्रय डुंबरे आणि डॉ. शिवाजी हुसे यांनी डॉ. सुभाष बागल यांच्या संत तुकारामांचे अभंग : एक चिंतन या ग्रंथावर संपादित असलेल्या तुकोबा : चिंतन आणि समीक्षा या ग्रंथाचे प्रकाशनही होणार आहे. समोराप समारंभास सुप्रसद्धि कवयत्री तथा लेखिका डॉ. वृषाली किन्हाळकर यांची उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख उपस्थितीत डॉ. दिलिप बिरुटे, डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. युवराज धबडगे, डॉ. सुखदेव पोटदुखे यांना निमंत्रित केले आहे. या कार्यक्रमासाठी आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित, प्रमुख डॉ. राम रौनेकर, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे , डॉ. दीपक राखुंडे, डॉ. लक्ष्मण गादगे यांनी केले आहे.




# पाऊस कवितेतेला, तुमच्या आमच्या मनातला कार्यक्रमातील कवितांनी श्रोते चिंब

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – भारतीय विचार साधना सभागृह भावे हायस्कूल मागे, टिळक नगर, सदाशिव पेठ पुणे येथे अखिल भारतीय साहित्य परिषद, साहित्य भारती पुणे महानगर आयोजित पावसावरील एक अनवट अभिव्यक्ती ''मल्हारधून'' पाऊस कवितेतेला, तुमच्या आमच्या मनातला हा एक तासाचा अत्यंत सुंदर कार्यक्रम झाला. या श्रवणीय कार्यक्रमाचे अप्रतिम लेखन डॉ स्वाती महाळक यांनी केले. या मध्ये त्यांनी व श्री लक्ष्मीकांत रांजणे यांनी सुंदर काव्य अभिवाचन केले तर त्याला चैत्राली अभ्यंकर यांनी आपल्या अप्रतिम आवाजात कधी कविता तर कधी सुंदर सुखद, व



पुन्हा पुन्हा ऐकावीत अशा पद्धतीने गाण्याने साथ दिली. त्यांच्या काही कविता व काही कवितेचे झालेले गाणे इतके श्रवणीय होते की ते ऐकताना श्रोते एवढे मंत्रमुग्ध झाले की काही श्रोतेजागच्या जागी डोलायला लागले होते.

कविता, गाणे किंवा कवितेचे अभिवाचन ऐकताना ते संपूच नये असेच वाटत होते. पावसामुळे किंवा व्यक्तिगतअडचणीमुळे जे श्रोते येऊ शकले नाही, त्यांनी खरंच अतिशय सुंदर कार्यक्रम मिस केला असे मी म्हणेल. कार्यक्रमाचा एक तास कधी संपला हे कळलेच नाहीं. बाहेर पावसाची शक्यता होती तो फारसा आला नाही पण सभागृहातील तुमच्या आमच्या मनातला कवितेतील पाऊसाने धो धो बरसून सर्वांच्या मनाला खुप चिंब केले, आणि आनंदित केले. खरंच चुकवू नये असाच हा कार्यक्रम होता. हा कार्यक्रम पुन्हा एकदा जास्त वेळ देऊन घेण्यात यावा अशी विनंती साहित्यिक श्री गिरीश वसेकर (देशपांडे) यानी केली आहे.



# जायंन्ट ग्रुपच्या चालण्याच्या स्पर्धेत सुधीर कोर्टीकर प्रथम

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – जायन्टस ग्रुप ऑफ चिकलठाणा या सामाजिक संस्थेने जायन्टस सप्ताहाच्या निमित्ताने जेष्ठ नागरिकांच्या चालण्याच्या स्पर्धांचे आयोजन रोपळेकर चौक ते दर्गा चौक या ठिकाणी दिनांक २० सप्टेंबर २५ रोजी सकाळी ६.३० वाजता केलेले होते. या स्पर्धे त पहिला गट ६० ते ६५ , दुसरा गट ६६ ते ७० तिसरा गट ७१ ते ७५ चवथा गट ७६ ते ८५ पर्यंत होता.

जायन्टस ग्रुप ऑफ चिकलठाणा यांच्या या चालण्याच्या स्पर्धेतीस खूप मोठा प्रतिसाद मिळाला. जवळपास शंभरहून अधिक स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता.सुप्रसिद्धज्येष्ठ कलावंत आणि ज्येष्ठ पत्रकार सुधीर कोर्टीकर यांनी ७० ते ७५ या वयोगटातील स्पर्धकांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या अपूर्व यशासाठी त्यांच्या सर्वा मित्रांनी जायंन्टस ग्रुप ऑफ चिकलठाणा यांच्या पदाधिकारी मंडळीनीत्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

आलेल्या सर्वच निमंत्रित मंडळींना स्पर्धकांना जायन्टस ग्रुप ऑफ चिकलठाणा यांच्या वतीने नास्ता चहा कॉफी दूध हे शिल्पा तोतला व शितल शेवतेकर यांच्या वतीने देण्यात आले. सर्व विजेत्यांना भगवत गीतेचे पुस्तक, प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. नवाकार फूडस यांचे सुनील छाजेड यांनी सर्वांना प्रमाणपत्रे दिली. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ.जीवन राजपूत युरो सर्जन जे.जे.हॉस्पीटल यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. माजी उप कुलगुरू डॉ.वि.ल. धारुरकर यांनीही सुरेख भाषणातून साऱ्यांना मंत्रमुग्ध केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाचे प्रमुख विनोद शेवतेकर, फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. गुरुदत्त राजपूत , स्पेशल कमिटी सदस्य सूर्यमाला मालाणी, माजी उप कुलगुरू डॉ.वि.ल.धारुरकर, विजय जोग, रमाकांत जगत, डॉ.प्रकाश झांबड, जयकुमार भोयरकर, रमाकांत पत्की, पारस छाजेड, ग्रुप अध्यक्ष मनोरमा मालपाणी, सचिव संगीता रुणवाल, कोषाध्यक्ष स्नेहलता रुणवाल, शिवप्रसाद तोतला, सुनील छाजेड, सुनील देशपांडे, प्रवीण कटारिया, प्रकाश रुणवाल, ऋषीराज शेवतेकर, यश वाघ, ओम खडके, अनुराधा शेवतेकर, हर्षा पाटील यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

# वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-४९



*२७ नक्षत्रांमधील दहावे नक्षत्र ''मघा'' हे आहे. सिंह राशीचे जातक या नक्षत्रावर जन्माला आलेले असतात. या नक्षत्राचा आराध्य वृक्ष वडाचे झाड आहे. हा वृक्ष जगात सर्वत्र आढळतो परंतु सर्वाधिक स्वरुपात, भारतात आढळतो. वटवृक्षाला असंख्य पारंब्या असल्याने त्याला 'अक्षय' से देखील म्हणतात.*

*ब्रह्मांडाचे प्रतिबिंब रूप म्हणून 'वटवृक्षा' कडे पाहिले जाते. हा वृक्ष हजारो वर्षे जगतो म्हणून याला सूर्य प्रकाशाची देखील खूप आवश्यकता असते. या वृक्षाचे नक्षत्र मघा आणि मघा नक्षत्रावर जन्मलेल्या जातकाची राशी 'सिंह', या राशीचा स्वामी देखील 'रवि' अर्थात सूर्य महाराज आहेत. या वृक्षाच्या मुळा मध्ये 'ब्रह्मदेव, मध्यभागात श्रीविष्णु आणि शाखांमध्ये भगवान शंकर यांचा वास असतो' असे शास्त्रान सांगितले असल्यामुळे या वृक्षाला अत्यंत पवित्र मानले आहे, 'मघा' नक्षत्राच्या वृक्षाला पर्यायी वृक्ष 'उंडल' आणि 'सुरंगी' हे आहेत. तव्दतच, मघा नक्षत्राची धैर्यौषधी 'माका' आहे.. 'माका' या वनौषधीचं महत्व वेदकाळापासून आहे. पितरांच्या कार्यात माक्याचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. 'मघा' नक्षत्राची देवता 'पितर' असून ''ॐ पितृभ्यो नमः'' हा मंत्र, या देवतेचा आहे. सिंह राशी ही उष्ण प्रकृतीची राशी असून अग्नि तत्वाची असलेने, रंगचकातील उष्ण रंगसंगती मधील रंगांचा प्रभाव असलेले 'वास्तुशास्त्र पेंटींग' जर या जातकांनी त्यांच्या घरात लावले तर, ट्रेडींग, ठेकेदारी, रासायनिक कारखाना, शस्त्रनिर्मिती, कलाप्राविण्य, गायन-वादन-नृत्य विषयक कला, लिखाण, पत्रकारिता, राजकारण या क्षेत्रात त्यांना अधिक प्रगती करता येते.*

*मघा नक्षत्राच्या चार चरणां मध्ये अनुक्रमे मंगळ, गुरू, बुध आणि चंद्र हे 'स्वामी ग्रह' आहेत. (त्या त्या चरणांचे...) म्हणून या नक्षत्राच्या आराध्य वृक्षाच्या प्रकृती प्रमाणे 'वटवृक्षा' प्रमाणे, दीर्घ आयुष्यासह, दीर्घ लाभासह सुखी व आनंदी जीवन जगावे अशी इच्छा असणाऱ्या जातकांनी 'वास्तुशास्त्र पेंटींग' जरूर उपयोगात आणावे...!* क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

लेकीला दिल लांब
आता भेटीची आसं
नाही घशाखाली सरकत
गोडाधोडाचा घास ॥२६५॥

पहाटेच्या पारी
सडा सारवण
देवाजीचा रथ
गेला नगरावरुन ॥२६६॥

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## सर जो तेरा चकराये...




ज्योतिर्मय साहित्य

आमच्याकडे जो पुंडलिक म्हणून न्हावी यायचा त्याचा आहार उत्तम होता. एक डझन केळी तो सहज पाच दहा मिनिटात फस्त करायचा. कधी कधी जेवायला यायचा तेव्हा चार पाच भाकरी किंवा आठ दहा पोळ्या त्याला लागायच्या. गावात कोणाकडे छोटे मोठे कार्य वा नवस वगैरे असला की हमखास न्हाव्याला बोलावले जायचे. त्याच्याकडे एक वाद्य होते. त्याला भेर म्हणायचे. भेर नावाचे वाद्य पूर्वी युद्धाच्या वेळी सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या अंगात वीरश्री संचारण्यासाठी वाजवले जायचे. पुढे ते आनंदाच्या प्रसंगीही वाजवले जाऊ लागले. गावात भेर वाजत असेल तर कोणाकडे काय कार्यक्रम आहे हे गावातील लोकांना कळायचे. भेर म्हणजे एक लांब पितळेचे तुतारी सारखे वाद्य असून न्हावी किंवा ते वाजवणारा आपल्या तोंडाने जोरात हवा फुंकून हे वाद्य वाजवायचा. या वाद्याचा पुढचा भाग रुंद आणि मोठा असल्याने गावकरी नवरदेव किंवा नवरी किंवा लहान मुलांच्या अंगावरून ओवाळून सुटी नाणी या भेरीच्या पुढील भागात फेकायचे. त्यावेळी अगदी पाच,दहा, वीस, पंचवीस, पन्नास आदी पैशांची सुटी नाणी असायची. नाण्यांनी ती भेर जड झाली की न्हावी ती काढून घ्यायचा. मंगल कार्याच्या प्रसंगी नवरदेव किंवा नवरीला कोणी काय आहेर दिला ते सुद्धा घोषणा करून सांगायचे काम या मंडळींकडे असायचे. आपल्या खास ग्रामीण ढंगात मग ही मंडळी त्याची घोषणा करायची.



पण आता काळानुसार या मंडळींनी स्वतःला बदलले आहे. आताचा नाभिक म्हणजे फक्त पूर्वीचा कैची, वस्तरा घेऊन हजामत करणारा राहिला नाही. अनेक प्रकारची आधुनिक साधने त्यांनी आपल्या व्यवसायात वापरायला सुरुवात केली आहे. ब्लिचिंग, मेकअप, फेसपॅक इ. गोष्टींचे तंत्र शिकून घेतले आहे. बरीच मंडळी तर आपल्या ग्राहकांना केसांची काळजी कशी घ्यावी, कोणते तेल, शॅम्पू वापरावेत यासारखी माहिती देत असतात.

आता लग्नात वऱ्हाडी मंडळींना फेटे बांधणे यासारखी कामेही ते चार पैसे मिळवण्यासाठी करताना दिसतात.

अशी ही नाभिक मंडळी. विविध कलांमध्ये निपुण ! गप्पा मारणे हा तर त्यांचा हातखंडा. त्यांच्या पोतडीत विविध बातम्या, रहस्ये दडलेली असायची आणि असतात. गावातील सगळ्या बातम्या त्यांना माहिती असतात. आपण फक्त श्रोत्याची भूमिका घेतली की झाले. गप्पांमध्ये गुंतवून ठेवण्याचे त्यांचे कौशल्य वादातीत. बहुतेक ही कला सुद्धा वंशपरंपरेनेच त्यांच्याकडे येते. दुकानात गर्दी असली तरी आपल्याला मोठया आदराने हाक मारून ते बोलावून घेतात. बसा साहेब, फक्त पाच मिनिट बसा, एवढे झाले की तुमचाच नंबर... असे म्हणून तो आपल्या हातात वर्तमानपत्र वगैरे सोपवतो आणि किमान अर्ध्या तासासाठी तो आणि आपण निश्चिन्त होतो.

शोले चित्रपटातील हरिराम नाई आठवतो का ? तो अशाच बातम्या जेलरला देत असतो. त्याच्या याच गोष्टीचा फायदा जय आणि वीरू (अमिताभ आणि धर्मेंद्र) करून घेतात. आणि मग चित्रपटात तो पोट धरून हसायला लावणारा प्रसंग घडतो. हरिराम एका माणसाची दाढी करीत असतो. **(क्रमशः)**





### दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## मुमुक्षुलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार

शाश्वत आत्मज्ञान हवे आहे, त्यासाठी देवपण अंगी आले पाहिजे. आपण सर्व मनुष्य जन्माला आलेलो आहोत. माणसाच्या मनात असलेल्या भावभावना, आनंद, राग, द्वेश, ईर्षा, जय पराजय स्नेहभावना या सर्व गोष्टी मनुष्य जन्माच्या जणु काही सोबती आहेत. या सर्वावर विजय मिळवून शाश्वत सत्य जाणुन देवत्वाकडे वाटचाल करणे म्हणजेच संसारात अंतिम सत्या पर्यन्त पोहचणे होय.

मानवीजीवनात दोन अंगे आहेत.

१) पशुपण २)देवपण पशुपणाचें अंग अज्ञानाच्या अंमलाखाली वावरते. देवपणाचे अंग आत्मज्ञानाच्या अंमलाखाली असते. बद्ध माणसाचे जीवन पशुपणाचे जीवन असते. त्याच्या आशा आकांक्षा भावन ,वासना,हव्यास देहसुखा भोवती घुटमळत असतात. द्रव्य, साधनसंपत्ती, प्रपंचाचाअतिरिक्त साठा याच्या भोवती त्याची बुद्धी अगदीच घट्ट पणे चिकटलेली असते. या देहबुद्धीची पकड एवढी घट्ट असते की तिच्यावर आघात होउन ती तेथून स्थान भ्रष्ट झाल्या शिवाय देवपणाकडे किंवा शाश्वत आत्मज्ञानाकडे जाण्याच मार्ग मोकळ होत नाही.

त्याच्या आयुष्यात असे काही प्रसंग येतात की त्याच्या मधील देवत्व जागे होते मग तो पशुपणातुन बाहेर पडण्यासाठी तळमळू लागतो. मनाच्या या अवस्थेला मुमुक्षु लक्षण असे म्हणतात. मुमुक्षुपणा ऊदय पावल्यावर माणसाला आपलें पूर्वायुष्य आठवते. आतापर्यंत झालेल्या चूका, कुकर्मातील भोगलेंले आयुष्य, आपल्या हातुन घडलेल्या चूका, कुकर्माची आठवण येऊन अतिशय वाईट वाटते. आणि यालाच ‘‘अनुताप‘‘ म्हणतात. **(क्रमशः)**

## संत आपल्याला जागे करतात



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

प्रत्यक्ष विषयापेक्षा विषयी माणसाची संगत फार वाईट असते, हे ज्याप्रमाणे संसारात, तसेच परमार्थातही लागू आहे. संगतीचा परिणाम नेहमी मनावर होतो; म्हणून चांगल्या विचारांच्या माणसाची संगत धरावी. चांगले-वाईट हे नेहमी आपल्यावरूनच ओळखावे. स्वत:ला सुधारण्याऐवजी आपण जगाची सुधारणा करायला जातो हेच आपले चुकते. जगात संत असतील असे पुष्कळांना वाटतच नाही. संताला ओळखायला आपल्या अंगी थोडेतरी भगवंताचे प्रेम असायला पाहिजे. आपल्याला आपल्या ध्येयाचा विसर पडला, परंतु संतांनी आपल्याला जागे केले. चुकीची वाट चालत असताना, ‘अरे, तू वाट चुकलास,’ अशी जागृती संतांनी आपल्याला दिली. तेव्हा, जिकडे पाठ होती तिकडे आपण तोंड केले आणि पुन: चालू लागलो, तर आपण योग्य स्थळी जाऊ.

संत आनंदरूप झाल्यावर स्वस्थ बसत नाहीत. ते ज्या लीला करतात त्या जगाच्या कल्याणासाठी असतात. त्या वेळीही ते आपल्या मूळच्या आनंदातच असतात. ते स्वस्थ बसलेले दिसले तरी जगाचे कल्याण करीतच असतात. आपण धडपड करून फुकट मरतो, त्यापेक्षा ते स्वस्थ बसून जिवंत राहतात, हे केव्हाही चांगलेच होय. संत आनंदरूप झालेले असल्यामुळे त्यांच्या वचनानुसार आपण जाऊ या. लोकांना उपदेश करण्यामध्ये संतांचा हेतू एकच असतो, आणि तो हा की, ‘जे मला कळले आहे ते लोकांना कळून लोक सुखी होऊ द्या.’ संत आपल्या स्वार्थासाठी सांगत नसल्याने, त्यांचे म्हणणे आपल्याला खोटे कसे म्हणता येईल ? प्रपंच हा दु:खमय आहे हे कळल्यावर त्यावर काहीतरी उपाय केला पाहिजे. तो संतांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या वाचनाने कळतो. त्या ग्रंथात सांगितलेले आपण करावे. आपण ग्रंथामध्ये जे वाचतो ते जर आचरणात आणले नाही, तर त्या वाचनाचा उपयोग नाही. वाचनाचे मनन झाले पाहिजे. साधन व वाचन बरोबर चालावे.

ज्या संतांचा ग्रंथ आपण वाचतो त्यांच्या कृपेवाचून तो नीट समजणार नाही. ज्याच्यावर त्यांची कृपा आहे त्याला, अंगी विद्वता नसताना देखील, त्या ग्रंथांचा बरोबर अर्थ अगदी स्वाभाविकपणे कळेल. विद्वान् हा कल्पनेने सत्यस्वरूपाचे वर्णन करतो, पण संत मात्र निश्चयाने, खात्रीने आणि अनुभवाने ते रूप काय आहे हे सांगतात. सत्पुरुषांच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे.

संतांची आज्ञा पालन म्हणजे संतसेवाच होय.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

ज्योतिर्मय साहित्य

आपण धार्मिक ग्रंथाचे अवलोकन करीत असताना आपणास असे लक्षात येते की प्रचंड ग्रंथसंपदा अध्यात्म या विषयावर निर्मीत झालेली आहे. केवळ वेद ग्रंथ पूर्वी ५,१०८ इतके होते. याशिवाय श्रुती, अरण्यके, ब्राह्मणे अशी संख्या हजारोंच्या घरात आहे. यातील सर्वच ग्रंथ अत्यंत मौलिक आणि विज्ञाननिष्ठ ज्ञान देत असून कोणताही ग्रंथ वाऊगा विचार मांडत नाहीत. या हजारो वेद ग्रंथाच्या शिवाय अठरा पुराणे व्यासांनी निर्मित केलेली आहेत. याशिवाय उपनिषदे अनेक आहेत. भगवद्गीता त्यावर झालेल्या टीका शेकड्याने उपलब्ध आहेत. रामायण हा ग्रंथ २०० कवींनी वेगवेगळ्या रूपात मांडला आहे. महाभारत हा प्रचंड मोठा ग्रंथ उपलब्ध आहे. आता हा प्रश्न पडतो की, इतके हजारो ग्रंथ उपलब्ध असताना, आणि हे सर्व अध्यात्माचाच विषय प्रतिपादन करीत असताना भगवद्गीते वरच्या एका वेगळ्या टिकेला ज्याला आपण भावार्थ दीपिका किंवा ज्ञानेश्वरी असे म्हणतो हा ज्ञानेश्वरी ग्रंथ ज्ञानेश्वरांनी निर्मित करण्यामागील प्रयोजन काय असावे ?

ज्यावेळेस ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निर्मित झाला त्यावेळेस संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज हे आजच्या कायद्याच्या भाषेत अज्ञान बालक होते. कारण त्यावेळेस त्यांचे वय केवळ पंधरा-सोळा वर्षाचे होते. केवळ प्रसिद्धी मिळावी आपला मान मरातब वाढावा ही भावना तर निश्चित स्वरूपात या बालकात नव्हती. मग ज्ञानेश्वरी हा ग्रंथ का निर्मित करावा लागला?

या ग्रंथाची निर्मिती करणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली हे याच कार्यासाठी म्हणजे ज्ञानेश्वरी ग्रंथ निर्मितीसाठी अवतरीत झाले हे आपण सर्वप्रथम मान्य करूयात. कारण हा दिव्य ग्रंथ निर्माण झाल्यावर त्यांनी आपले इती कर्तव्य पार पडले असे जाणून इहलोकीची यात्रा संजीवनी समाधी घेऊन पूर्ण केली.

निवृत्ती,ज्ञानदेव,सोपान व मुक्ता ही चार अलौकिक भावंडे त्यांचे पूर्व जन्मातील संचित, प्रारब्ध व क्रियमान कर्मे भोगून व तपाच्या योगे पूर्णपणे संपवून मागील जन्मातच मुक्त झाली होती. ज्ञानेश्वर माऊली तर आपल्या हरी पाठात आपण ‘‘मागिलीया जन्मा मुक्त झालो‘‘ असे निःसंदिग्धपणे ग्वाहीच देतात. अशे जीवन्मुक्त महात्मे हे केवळ प्रभू इच्छेने लोक कल्याणा साठी या भूतलावर जन्म घेतात.एरवी त्यांना त्यांची कर्म बंधने संपल्याने नवीन जन्म घेण्याची गरज उरत नाही.

आपणास असा प्रश्न पडू शकतो की ज्ञानेश्वर महाराज यांना ते आधीच मुक्त झालेले असताना प्रभू आज्ञेने जन्म का घ्यावा लागला? त्यांच्या जन्माचे प्रयोजन काय होते? लोक कल्याण करण्यासाठी म्हणावे तर ही गरज तर सर्वकालिक आहे. मग त्या वेळेसच का?

या प्रश्नाचे उत्तर आपणास खालील अभंगात सापडते.

आदिनाथ गुरू सकल सिद्धांचा /
मछींद्र तयाचा मुख्य शिष्य/
मछींद्राने बोध गोरक्षासी केला/
गोरक्ष वोळला गहणीप्रती/
गहणी प्रसादे निवृत्ती दातार
ज्ञानदेवा सारं चोजविले//

आदिनाथ म्हणजे भगवान महादेव, ते विनाशाची देवता आहेत.

हे कलियुग आहे पण अपेक्षेपेक्षाही अधिक वेगाने या भूतलावर दुष्ट प्रवृत्ती वाढू लागल्या आहेत.या गतीने पाहू जाता पृथ्वीचा विनाश केव्हाही होऊ शकतो.कलियुग सुरू होऊन जेमतेम ५ हजार वर्षे झाली तोवर हे जग विनाशाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे. आज जगभर हजारो अणुबॉम्ब हायड्रोजन बॉम्ब, मिसाईल्स हे जगाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवण्यासाठी सज्ज आहेत. **(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**सद्भक्तवत्सले देवि भक्तहितपरायणे।**
**भक्तकल्पलते देवि शरणं मे ददातु ते।।६१।।**

हे सद्भक्तवत्सले, भक्तहितपरायणे देवी, हे भक्तकल्पलते देवी, मला तुझे शरण दे.

**दुर्गे दुर्गस्य सोपानमारोहयामि सर्वदे।**
**गिरिमुल्लङ्घ्य मोहस्य शरणमागतोऽस्म्यहम्।।६२।।**

हे दुर्गे, सर्वदे, मी माहूरगडाचे सोपान चढत आहे. मोहाचा पर्वत उल्लंघून मी तुला शरण आलो आहे.

**उर्ध्वमोर्ध्वमहं मातो यथाऽगच्छन् तथा सुखम्।**
**अनुभवामि सामीप्यं शरणागतरक्षिके।।६३।।**

जसे जसे मी वर वर येत आहे, तसे तसे सुख आहे. हे शरणागतरक्षिके, मी तुझे सामीप्य अनुभवत आहे.

**पूर्वपुण्यं न जानामि यतस्त्वं मयि स्निह्यसि।**
**मन्ये तवैव वात्सल्यं तव स्नेहस्य कारणम्।।६४।।**

मी पूर्वपुण्य जाणत नाही, ज्यामुळे तू माझ्यावर स्नेह करतेस. तुझ्या स्नेहाचे कारण मी तुझे वात्सल्यच मानतो.



## आरोग्य संजीवनी

### हा तर जर वेळोवेळी काढण्यात आला नाही तर....

ज्योतिर्मय साहित्य

१) लहान आतड्याला आतून हा थर चिटकल्यामुळे लहान आतड्यातून जे आहार रसाचे रक्तात शोषण होते ते व्यवस्थित होत नाही. त्यामुळे आपण जे खातो त्यातून जेवढे पोषक तत्व मिळायला पाहिजेत तेवढे मिळत नाहीत. त्यामुळे खाऊन-पिऊन कुपोषित असल्यासारखा प्रकार घडतो, त्यालाच आपण अंगी लागत नाही असेही म्हणतो आणि त्यामुळे अशक्तपणा जाणवतो तसेच प्रतिकार शक्तीही कमी होऊन वारंवार आजारी पडण्याचे प्रकार सुरु होतात.

२) जर फिल्टर चे पाणी पाच-सहा महिने बाजूला ठेवले तर त्यातसुद्धा किडे होतात. मग हा जो अन्ननलिकेला आतून, लहान आतड्याला आतून जो थर चिटकलेला आहे, त्यातसुद्धा लहान-लहान जंतू तयार होतात आणि हेच जंतू पुढे रोगजंतूंचे रूप धारण करतात आणि आपल्याला वेगवेगळ्या रोगांना, आजारांना बळी पडतात म्हणून पोटातून बऱ्याचशा आजारांचे मूळ आहे असं म्हणतात.

३) आपली आतडी आपल्या उंचीच्या साधारण सहा पट लांब असतात. त्यांची जी हालचाल चालू असते त्याला वैद्यकीय भाषेत म्हणतात. या हालचालीमुळे अन्न हळूहळू पुढे सरकत असते. पण आतड्यांची ही हालचालच जर त्याला चिटकलेल्या विषारी द्रव्यांमुळे, जडत्व आल्यामुळे कमी झाली तर अन्न खूपच हळू-हळू पुढे सरकते, म्हणजे ते बराच वेळ एकाच ठिकाणी साचून राहते, त्यामुळे पोटात गच्च-गच्च वाटते, अन्न बराच वेळ एकाच ठिकाणी साचून राहिल्यामुळे गॅस पण तयार होतो, आणि अन्न हळू-हळू पुढे सरकत असल्यामुळे मल बनायला पण वेळ लागतो त्यामुळे पोट साफ व्हायला पण अडचण येते, मग दोन-तीन वेळा पोट साफ करायला जावे लागणे किंवा पोट साफ व्हायला बराच वेळ लागणे असे प्रकार सुरु होतात.

त्यामुळे पचन संस्थेचे शुद्धीकरण करणे आवश्यक आहे कारण आतड्याला आतून चिटकलेली विषारी द्रव्ये काढून टाकली तर पोट गच्च गच्च वाटणे, गॅस होणे, पोट साफ व्हायला अडचण येणे या समस्या दूर होऊन आपण जे खातोय त्यातून जास्तीत जास्त पोषक घटक शरीराला मिळून अशक्तपणा दूर तर होईलच शिवाय प्रतिकार शक्तीही वाढेल आणि वारंवार आजारी पडण्याचे प्रकार निश्चितपणे थांबतील. शिवाय रोगजंतूंची पैदासच न होण्यामुळे गंभीर आजारांपासून बचावही होईल.

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

बिभीषण ठरवितो आता आपण रामाला शरण जावे.त्याने असा विचार केला असेल की भाऊ असून तो घरभेदी झाला. असे वाटलेच असेन.त्याने ठरविले रामाला भक्त म्हणून भेटायचे. प्रत्यक्ष युद्धात सहयोग करायचा नाही. पण रामानी सल्ला मागितला तर तो मात्र द्यावा.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

रामाच्या हेरांनी बिभीषण येणार हे सांगितले. कांहीं योद्धे म्हणाले की हा रावणाचा भाऊ आहे. तोही मायावी असेल.तो कदाचित आपल्या कडून बातम्या काढून रावणाला सहकार्य करेल.सुग्रीवही त्याला घेण्यास अनुकूल नव्हता.सर्वांचे बोलणे ऐकून राम म्हणाले हनुमानाला विचारा.कारण त्यास ज्ञाना बरोबर अनुभव आहे. हनुमान म्हणाले तो शरण येत असेल तर नक्की त्यास शरण द्या. शेवटी राम म्हणाले ,अरे रावण जरी प्रत्यक्ष शरण आला तरी त्यास मी स्वीकारील हा तर बिभीषण आहे. एखादा पांथस्थ रात्रीपुरता आपल्या घरी राहिला तर त्यास शरण आला म्हणत नाहीत.शरण आला तर त्यास आसरा देणे व त्याचे रक्षण करणे हे दोन्ही असेल तरच त्यास शरण म्हणतात. रावण वध नंतर आणि बिभीषण जेव्हा राजा झाला तेव्हा असा एक प्रसंग आला की बिभीषणाने गाय मंदिरात घुसली म्हणून एक गवताची काडी फेकली व ती गाय मेली.लोक त्यास देह दंड देत होते.राम म्हणाले हा मला शरण आला आहे याच्या जीविताचे रक्षण ही माझी जबाबदारी आहे तो जे कर्म आता करील त्याची जबाबदारी, उत्तरदायित्व माझे असेल.त्या मुळे ती शिक्षा मला द्या.

**(क्रमशः)**

# कमलनयन बजाज रुग्णालयाला राष्ट्रीय स्तरावरील डिजिटल हेल्थ एक्सलन्स पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** कमलनयन बजाज रुग्णालयाचा शिरपेचात मनाचा तुरा रोवत आपल्या इतिहासात आणखी एका सुवर्णक्षणाची नोंद केली आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय रुग्ण सुरक्षा परिषदेत (नॅशनल पेशन्ट सेफ्टी कॉन्फरेन्स) कमलनयन बजाज रुग्णालयाला डिजिटल हेल्थ एक्सलन्स पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

ही कामगिरी महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक असून, राज्यातील पहिले व एकमेव रुग्णालय तसेच भारतातील मोजक्या रुग्णालयांपैकी एक म्हणून कमलनयन बजाज रुग्णालयाने हा मान मिळवला आहे. हा पुरस्कार चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अतुल मोहन कोचर व चे चेअरमन रिजवान कोईता यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कमलनयन बजाज रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस आणि वैद्यकीय संचालक डॉ. अजय वसंत रोटे यांनी संपूर्ण टीमच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. डॉ. फर्नांडिस म्हणाले, ''रुग्ण हे आमच्या प्रत्येक उपक्रमाच्या केंद्रस्थानी आहेत. हा पुरस्कार आमच्यासाठी फक्त सन्मान नाही तर जबाबदारी देखील आहे. तंत्रज्ञान व करुणा यांच्या संगमातून रुग्ण-केंद्रित सेवा, सुरक्षितता व गुणवत्तेत सातत्याने प्रगती करणे हेच आमचे ध्येय आहे.''

डॉ. फर्नांडिस पुढे म्हणाले, ''आमचे ध्येय अशी आरोग्य सेवा आणि इकोसिस्टम निर्माण करण्याचे आहे, जिथे




शहरी किंवा दुर्गम ग्रामीण भागातला कोणताही रुग्ण मागे राहणार नाही. डिजिटल आरोग्य साधनांचा उपयोग करून आम्ही सर्वसमावेशक, कार्यक्षम आणि वैयक्तिक पातळीवरील सेवा देण्याचा प्रयत्न करीत आहोत. हा पुरस्कार कमलनयन बजाज हॉस्पिटलला मानवतेच्या स्पर्शासह नवोन्मेषाचे राष्ट्रीय आदर्श बनविण्याच्या आमच्या निर्धाराला अधिक बळकट करणार आहे.''

वैद्यकीय संचालक डॉ. अजय रोटे यांनी सांगितले, ''डिजिटल हेल्थ अंगीकारणे हे भविष्यातील आरोग्यसेवेचे खरे शस्त्र आहे. इलेक्ट्रॉनिक हेल्थ रेकॉर्ड, -आधारित निर्णय प्रणाली, टेलीमेडिसिन, रिअल-टाइम पेशंट मॉनिटरिंग या सर्व उपक्रमांतून आम्ही सुरक्षित, जलद आणि रुग्णाभिमुख सेवा देण्यास कटिबद्ध आहोत.''

मराठवाड्यातील पहिले डिजिटल हेल्थ मानांकनप्राप्त रुग्णालय

डिजिटल हेल्थ स्टँडड्र्सचे मानांकन मिळवणारे मराठवाड्यातील एकमेव रुग्णालय

इलेक्ट्रॉनिक हेल्थ रेकॉर्डस् पेपरलेस व त्रुटीमुक्त नोंदणी

कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञान अचूक निदान व उपचार

टेलीमेडिसिन सेवा ग्रामीण भागापर्यंत तज्ज्ञांची पोहच

रिअल-टाइम पेशंट सेफ्टी डॅश बोर्डस् रुग्ण सुरक्षेत तडजोड नाही

डेटा ॲनालिटिक्स व प्रेडिक्टिव्ह मॉडेलिंग जोखीम कमी करणे व परिणामकारकता वाढवणे

मराठवाड्याच्या आरोग्यदृष्टीला नवा आयाम

हा पुरस्कार कमलनयन बजाज रुग्णालयाच्या रुग्ण सुरक्षितता व गुणवत्तेतील सातत्यपूर्ण प्रयत्नांचे'' प्रतीक आहे. मराठवाड्यातील आरोग्य सेवेचा चेहरा बदलण्याचे काम या रुग्णालयाने केले असून आज ते विश्वास, नावीन्य आणि करुणामय सेवेचे केंद्र ठरले आहे.

मानवी स्पर्श आणि डिजिटल बुद्धिमत्ता यांच्या संगमातून कमलनयन बजाज रुग्णालयाने राष्ट्रीय पातळीवर आरोग्यसेवेत नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत.



**श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज येथे आयुर्वेद दिन निमित्ताने आयुर्वेद चा प्रचार व प्रसार व्हावा हे उद्दीष्ट ठेवून जनसामान्य मध्ये जागरूकता निर्माण करण्याकरिता सातारा गाव परिसरात विद्यार्थी रॅली काढण्यात आली.ही रॅली यशस्वी होण्याकरिता डॉ फातिमा सय्यद, डॉ. निवेदिता ताजने यांनी मोलाचे योगदान दिले.प्राचार्य डॉ स्वाती इटगी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता संस्थेचे अध्यक्ष इंजिनियर बसवराज मंगरूळे यांनी प्राचार्य, सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.**

# छुपे क्रांतीकारक : बादल गुप्ता

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

बिनॉय बसू, बादल गुप्ता आणि दिनेश गुप्ता यांनी आठ डिसेंबर १९३० रोजी १२ वाजता टॅक्सी ड्रायव्हरला राईटर्स बिल्डींग येथे सोडण्यास सांगितले. युरोपियन वेषात जेंव्हा पहारा करणाऱ्या पोलिसांनी त्यांना बघीतले तेंव्हा आत्मविश्वासाने रायटर्स बिल्डींगमध्ये त्यांनी प्रवेश केला. पोलीस ऑफिसर आणि त्यांच्या टीमला खरेच हे तिघेही युरोपियन अधिकारी वाटले. जीना चढून तिघेही पहिल्या मजल्यावर गेले. कर्नल सिंप्सन आपल्या केबीनमध्ये पत्र लिहीत बसले होते. त्यांच्यापाशी त्यांचा सहाय्यक जेसी गुहा आणि शिपाई बागल उभे होते. दरवाजाच्या बाहेर शिपाई फागू सिंह उपस्थित होता. फागूसिंह ने त्यांना विझिटिंग कार्ड मागितले आणि थांबावे लागेल असे सांगत असतानाच त्याला बेशुद्ध करीत तिघेही केबीनमध्ये घुसले. आपल्या हातात रिव्हॉल्वर खिशातून बाहेर काढली. सिंप्सन उभे राहून काही म्हणायच्या आतच रिव्हॉल्वरच्या गोळ्यांनी त्यांच्या शरीराची चाळणी करण्यात आली. संपूर्ण सचिवालयात या घटनेने पळापळ सुरवात झाली. राइटर्स बिल्डींगमध्ये गोळीबार झाला लगेच सशस्त्र सुरक्षा सैनिक पाठवा असे निरोप गेले. पोलीस कमीशनर चार्ल्स टेगार्ट याने वाहन बोलविण्याऐवजी पळतच राइटर्स बिल्डींग गाठली. तोपर्यंत इमारतीच्या पश्चिमेकडे तिघेही क्रांतीकारक निसटले. तोपर्यंत आय.जी. क्रेग याने तीघांवर गोळ्या झाडल्या. क्रेग आणि फोर्ड यांच्याशिवाय कोणीही केबीनबाहेर येण्यास धजावले नाही. फोर्ड ने क्रेग यांच्या हातातील रिव्हॉल्वर घेऊन पुन्हा तिघांवरही गोळ्या झाडल्या. तोपर्यंत अजून फौजफाटा तेथे पोहोचला. तोपर्यंत नेल्सन व इतर अधिकाऱ्यांवर तिघांनी गोळ्या झाडून त्यांना जखमी केले. एका पोलीस अधिकाऱ्याची गोळी दिनेश गुप्ता यांच्या खांद्याला लागली. ज्या पासपोर्ट कार्यालयात तिघेही क्रांतीकारक होते तिथे त्यांना घेरण्यात आले. दरवाज्यावर आणि



इतरत्र बरेच ब्रिटीश पोलीस अधिकारी आपल्या बंदूका घेऊन तिघांना मारण्यासाठी सज्ज होत्या. तिघांनीही ओळखले की, आता आपणाला ते जखमी करून जिवंत पकडणार. त्यांच्या पिस्तुलातील गोळ्या संपत आल्या होत्या. तिघांनीही मरणाला सामोरे जाण्याचे ठरविले. जिवंत त्यांच्या हातात न लागण्यासाठी बादल गुप्ता यांनी आपल्या खिशातील पोटॅशियम सायनाइडचे कॅप्सुल गिळून टाकले. पोलीसांनी त्यांच्याकडे बघेपर्यंत बादल गुप्ता खाली कोसळले. बिनॉय बसु आणि दिनेश गुप्ता यांनी स्वतःवर गोळ्या झाडून घेतल्या आणि दोघेही खाली कोसळले. ब्रिटीश पोलीसांनी बघीतले तर... बादल गुप्ता जीवंत नव्हते. बिनॉय बसु आणि दिनेश गुप्ता यांना ताबडतोब कलकत्ता मेडिकल कॉलेजच्या हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तर बादल गुप्ता यांचे शव शवागारामध्ये मध्ये नेण्यात आले. १३ डिसेंबर १९३० रोजी बिनॉय बसू यांचे हॉस्पिटल मध्ये निधन झाले. दिनेश गुप्ता यांना वाचविण्यात ब्रिटीश शासनाला यश आले. ७ जुलै १९३१ रोजी त्यांना कोर्ट आदेशाप्रमाणे फाशी देण्यात आले. या घटनेने फक्त हिंदुस्थानातच नव्हे तर जगभर चर्चा झाली आणि ब्रिटीश भारतीय जनतेवर करीत असलेल्या अन्यायाची माहिती सर्वांपर्यंत पोहोचली.




बंगाल व्हॉलंटियर्समधील नेतृत्व,प्रशिक्षण व मिशनमध्ये बादल गुप्ता यांचा सहभाग अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यांनी अनेक क्रांतीकारकांना प्रेरणा दिली आणि ब्रिटिशांविरुद्ध आंदोलन मजबूत केले.बादल गुप्ता हे बंगाल व्हॉलंटियर्स चे अहम सक्रिय सदस्य होते. त्यांच्या तसेच बिनॉय बसू आणि दिनेश गुप्ता यांच्या सहभागातील ऐतिहासिक राईटर्स बिल्डिंग मोहीम भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अजरामर ठरली.बंगाल प्रांत आणि भारतातील इतर भागांमध्ये समर्थकांनी बेनॉय,बादल आणि दिनेश यांना शहीद मानत जहाल क्रांतिकारक मोहीम जादा भक्कम केली.स्वातंत्र्यानंतर डलहौसी स्क्वेअरला बिनॉय-बादल-दिनेश त्रिकुटाच्या नावावरून बीबीडी बाग असे नाव देण्यात आले. त्यांच्या हल्ल्याच्या स्मरणार्थ रायटर्स बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यावरील भिंतीवर म्युरल कोरण्यात आले आहे.












# शिवचरित्राच्या अभ्यासासाठी जीवन समर्पित करणारे इतिहासकार गजानन मेहेंदळे

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

''शिवाजी हिज लाईफ अँड टाइम्स'' हा एक हजार पानांचा इंग्रजी ग्रंथ आणि श्री राजा शिवछत्रपती हा अडीच हजार पानांचा मराठी ग्रंथ हे या संशोधनातून साकार झाले आहेत. यामध्ये जवळजवळ सात हजार संदर्भ दिले आहेत. याबरोबरच शिवछत्रपतींचे आरमार, आदिलशाही फर्माने या पुस्तकांचे ते लेखक आहेत. ''टिपू: ॲज ही रिअली वाज '' ही त्यांची इंग्लिश पुस्तिका यापूर्वीच प्रकाशित झाली आहे. त्यांचा ''टिपू: ॲज ही रिअली वाज '' हा ग्रंथ देखील प्रकाशित झाला असून औरंगजेबाच्या धार्मिक धोरणावर त्यांचा ग्रंथ येऊ घातलेला होता.

भारतात इस्लामिक सत्तेचे पाय पहिल्यांदा रोवल्यापासून पुढे जवळजवळ हजार वर्षे या राजवटींनी येथील प्रजेवर अनन्वित अत्याचार केले. या राजवटींनी अवलंबिलेले धार्मिक धोरण आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यामुळे झालेला आमुलाग्र बदल हा आगामी काळात प्रकाशित होणाऱ्या भारतातील इस्लामी राजवट आणि शिवछत्रपतींचे स्वराज्य या ग्रंथाचा विषय होता. गजाभाऊंनी एकदा म्हटले होते, ''शिवाजी महाराजांना इतिहासातून काढले तर आपला इतिहास कुठे जातो? आणि त्यांचा इतिहासात समावेश केला तर कुठे जातो? हे महत्वाचे आहे.



इस्लामी जुलमी राजवटींना शिवाजी महाराजांनी रोखले, हे जर कळले तर शिवचरित्र कळले.''

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाचा अभ्यास

गजाभाऊंनी सन २००० ते २०१७ अशी १७ वर्षे पहिले आणि दुसरे महायुद्ध याचा सखोल अभ्यास करून त्यावर सुमारे सहा हजार पानांचे लेखन पूर्ण केले आहे. आगामी काळात त्याचे १० ते १२ खंड प्रसिद्ध होणार होते. त्यातही गुप्त संदेश उलगडणे आणि त्यांचे वाचन करणे या विषयावर त्यांनी एक पुस्तक लिहिले आहे.

अभ्यासू व्यक्तिमत्व

गजाभाऊ भारत इतिहास संशोधक मंडळाचे ज्येष्ठ सभासद होता. मागील पन्नास वर्षात असा दिवस क्वचितच गेला असेल की, गजाभाऊंनी शिवकालीन कागदपत्रे अभ्यासली नाहीत. अभ्यास कसा करावा, ध्येयासक्त होऊन काम कसे करावे, अभ्यासासाठी विविध भाषा शिकल्याने कशी माहिती मिळविता येते हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते. आजही गजाभाऊ जर्मन भाषा शिकत होते. अतिशय बुद्धिमान आणि दांडगी स्मरणशक्ती असलेल्या गजाभाऊंचा मित्रपरिवारही मोठा आहे. त्यामधील विशेष उल्लेख करावा लागेल पुण्याच्या माजी आणि व्यासंगी खासदार श्री. प्रदीपदादा रावत यांचा.

**विश्व संवाद केंद्र पुणे**

विविध संस्थांचे मार्गदर्शक

भारत इतिहास संशोधक मंडळाबरोबरच भांडारकर संस्था, डेक्कन कॉलेज, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ या संस्थांशी गजाभाऊ अनेक वर्षे संलग्न आहेत. विशेष म्हणजे भारत सरकारच्या भारतीय इतिहास अनुसंधान परिषद (आयसीएचआर) या संस्थेमध्ये गजाभाऊंना निमंत्रण देऊन सल्लागार सदस्य केले गेले. महाराष्ट्र शासनाने शिवरायांची जन्मतिथी निश्चित करण्यासाठी केलेल्या समितीत ते होते. काही काळ बालभारतीच्या इतिहास पाठ्यपुस्तक मंडळाचे सल्लागार होते.



**या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।**



# ।। भक्ती आणि शक्तीच्या उपासनेचा नवरात्र उत्सव ।।

**ज्योतिर्मय साहित्य**

नवरात्र म्हणजे शक्तिची उपासना.शक्ति म्हणजे देवी. श्री महाकाली, श्री महालक्ष्मी, आणि श्री महासरस्वती, यांची देवीच्या नऊ रूपात नवरात्रात पूजा केली जाते. विद्या बुद्धी प्राप्ती करता सरस्वतीचे पूजन केले जाते. धनधान्य सुबत्ते, करता महालक्ष्मी उपासना करावी. व शत्रू संहार, सामर्थ्य प्राप्ती करता महाकालीची उपासना करावी. घरोघरी घटस्थापना केली जाते. एका कोऱ्या पाटीत काळी माती घेऊन त्यात नऊ प्रकारचे धान्य पेरले जाते, त्यात कलश ठेवून पाच विड्याचे पाने व नारळ ठेवतात, रोज पाणी दिल्याने पिक वरती येते, त्या कलशावर रोज झेंडूच्या फुलांच्या माळा सोडल्या जातात. काही ठिकाणी चौरंगावर कलश मांडून त्याच्याभोवती काळी माती टाकून धान्य पेरतात. नवरात्रात धूप, गुगुळ, याच महत्त्व आहे त्यामुळे घरात वातावरणात प्रसन्नता येते.

शारदीय नवरात्रीचे ९ दिवस माता दुर्गेच्या, (महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती. ) ९ रूपांना समर्पित आहेत. दररोज माता दुर्गेच्या वेगळ्या रूपाची पूजा केली जाते अखंड दिप प्रज्वलीत ठेवला जातो. सकाळ- संध्याकाळी देवीची नवरात्राची आरती करतात.... उदो बोला उदो अंबाबाई माऊलीचा हो.... उदो कारे गर्जती काय महिमा वर्णू तिचा हो... ही नवरात्राची आरती होते.काही जण नऊ दिवस उपवास करतात. नवरात्राचे नऊ दिवसात युध्दात देवीने अनेक दैत्याचा संहार केला.महिषासूराचाही वध केला.म्हणूनच महिषासूरमर्दिनी नाव रूढ झाले.या तिच्या शक्ति रुपाचीच पूजा नवरात्रीत केली जाते. या देवी सर्वभूतेषु शक्ती रुपेण संस्थीता, या देवी सर्वभूतेषु लक्ष्मी रुपेण संस्थीता, या देवी सर्वभूतेषु मातृरुपेण संस्थीता,.... नमस्तस्ये नमस्तस्ये नमस्तस्ये नमो नमः ही देवी स्तुती म्हणतात. कुलदेवीची पोथी वाचतात. नऊ दिवस होईल तेवढी जास्तीतजास्त या शक्तीदेवीची उपासना करायची असते.देवीच्या पाठाचे वाचन करायचे असते.अनेक ठिकाणी व्यक्तिगत व सार्वजनिक ठिकाणी देवीचे पाठ केले जातात. शैलपुत्री, ब्रम्हचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडी,स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी, सिध्दिदात्री, अशी देवीची नऊ रूपे आहेत. महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती, ह्या रूपातही देवीची पूजा केली जाते. नवरात्राचे नऊ दिवस वेगवेगळ्या फुलांच्या माळा घालण्याची प्रथा अनेक ठिकाणी आहे.

पहिली माळ-शेवंती आणि सोनचाफ्यासारख्या पिवळ्या फुलांची माळ. दुसरी माळ-अनंत, मोगरा, चमेली, किंवा तगर यांसारख्या पांढऱ्या फुलांची माळ. तिसरी माळ-

निळी फुले. गोकर्णीच्याकिंवा,कृष्णकमळाचे फुलांच्या माळा.चौथी माळ-केशरी अथवा भगवी फुले. अबोली, तेरडा, अशोक किंवा तिळाची फुले.पाचवी माळ-बेल किंवा कुंकवाची वाहतात..सहावीमाळ-कर्दळीच्याफुलांची माळ.सातवी माळ-झेंडू किंवा नारिंगीची फुले.आठवी माळ-तांबडी फुले. कमळ, जास्वंद, कण्हेर किंवा गुलाबाच्या फुलांची माळ.नववी माळ-कुंकुमार्चन करतात.

हिंदू दिनदर्शिकेनुसार, अश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीला घटस्थापना केली जाते.

२२ सप्टेंबर २०२५ सोमवारी अश्विन शुद्ध प्रतिपदा तिथी घटस्थापना होत आहे रंग पांढरा शैलीपुत्री देवीची पूजा. गाईचे शुद्ध तूपाचा नैवेद्य.

२३ सप्टेंबर २०२५ मंगळवार तिथे द्वितीया रंग लाल. माता ब्रह्मचारीणी देवीची पूजा. साखरेचा नैवेद्य.

२४ सप्टेंबर २०२५ तृतीया बुधवार रंग निळा. चंद्रघंटा देवीची पूजा. दूध व दुधापासून तयार केलेले पदार्थाचा नैवेद्य.

२५ सप्टेंबर २०२५ किती तृतीया गुरुवार रंग पिवळा. विनायक चतुर्थी पूजा. मालपूवा चा नैवेद्य.

२६ सप्टेंबर २०२५ तिथी चतुर्थी शुक्रवार रंग हिरवा. माता कुष्मांडा देवीची पूजा व उपांग ललिता व्रत.मालपूवा नैवेद्य.

२७ सप्टेंबर २०२५ २५ पंचमी शनिवार रंग राखाडी. स्कंदमाता पूजा. केळाचा नैवेद्य

२८ सप्टेंबर २०२५ तिथी षष्ठी रविवार रंग केसरी.नारंगी कात्यायनी देवी पूजा. मधाचा नैवेद्य.

२९ सप्टेंबर २०२५ किती सप्तमी सोमवार रंग मोरपंखी. कालरात्री पूजा व सरस्वती आवाहन. गुळाचा नैवेद्य.

३० सप्टेंबर २०२५ तिथी महाअष्टमी मंगळवार गुलाबी रंग. महागौरी पूजा. सरस्वती पूजा. दुर्गा अष्टमी.कुमारिका पूजन करतात. नारळाचा नैवेद्य



१ ऑक्टोबर २०२५ बुधवार महानवमी व नवमी होम माता सिद्धीदात्री. कुमारिका पूजन करतात. रंग जांभळा.आयुध पूजन. तिळाचा नैवेद्य.

२ ऑक्टोबर २०२५ गुरुवार विजयादशमी दिवशी अंबा सिमोल्लघनाला निघते.आयुध पूजन. पालखीतून मिरवणूक निघते. व दुसऱ्या दिवशी उत्सव मुर्त्यांचे विसर्जन होते. दुर्गा विसर्जन केले जाते.

विजया दशमी दिवशी संध्याकाळी सिमोल्लंघना नंतर देवीच्या मंदिरात दर्शन केल्यानंतर, एकमेकांना भेटून सोने ( अभेट्याची पानं)पुर्वापार।परंपरा प्रमाणे, दिले जाते. एकमेकातील भांडण गैरसमज विसरून परत एकत्र येण्याचा हा संदेश असतो.

ह्या कालावधीत देवीचा नवार्णवमंत्र-

।। ओम ऐंम ह्रिंम क्लीं चामुण्डायै विच्चै नमः।। जप करावा.

नवरात्राचे आरतीत देवीच्या रोजच्या रूपाचा वर्णन आहे.प्रतिपदेला घटस्थपाना,द्वितीयेला चौसष्ट योगिनी




पूजा,तृतियेला शृंगार,चतुर्थीला विश्वव्यापक जननी,पंचमीला उपांगललिता,षष्ठीचे दिवशी गोंधळ,सप्तमीचे दिवशी सप्तशृंग गडावर,अष्ठमीला अष्टभुजा नारायणी,नवमीला नवदिवसांचे पारायण होते,आणि दशमीचे दिवशी अंबा सीमोल्लंघनाला निघते.

नवरात्रात जोगवा मागणे हा ही एक देवी उपासनेचा भाग आहे.पाच घरी जाऊन मूठभर तांदूळ किंवा पिठाचा जोगवा मागतात.आपल्यातला अहंकार नष्ट व्हावा ही या मागची कल्पना आहे.

अनादी निर्गुण निर्गुण प्रगटली भवानी .।
मोह महिषासूर मर्दना लागुनी.।।
त्रिविध तापांची कराया झाडणी ।।
भक्तालागुनी पावसी निर्वाणी.।।
आईचा जोगवा जोगवा मागेन.।।
द्वेत सारुनी माळ मी घालीन ।।
हाती बोधाचा झेंडा मी घेईन ।।
भेदरहित वारिसी जाईन.।।
नववीध भक्तिच्या करुन नवरात्रा ।।
करुन पोटी मी मागेन ज्ञानपुत्रा ।।
ही एकनाथ महाराजांची रचना प्रसिद्ध आहे.घरोघरी हा जोगवा म्हटला जातो.

-कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची रेणुका माता,तुळजापूरची तुळजाभवानी हे तीन पूर्ण पीठं,तर वणीची सप्तशृंगी देवीचे अर्ध शक्तिपिठ असे साडेतीन शक्तिपिठे आहेत.नवरात्रात ईथे जाऊन दर्शन घेणे खूप भाग्याचे समजले जाते.नासिक- चांदवड-रेणुका देवी,

मुंबई-महालक्ष्मी. वज्रेश्वरी-रेणुकामाता.

चिखली,रेणुकादेवी,अमरावती-एकविरा व अंबामाता,कोराडीची देवी-नागपूर, आंबेजोगाई ची देवी,जळगांवची-ईच्छा देवी, आदी ठिकाणी देवीच्या मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते. या ठिकाणी भाविकांचे उत्साहाला उधाण आले असते. अतिशय प्रसन्न वातावरण असते. फुलं, माळा, प्रसादाची,खण-ओटीची दुकाने थाटली दिसतात.

दुसरीकडे उत्सवाचे सार्वजनिक स्वरूप बघता

अतिशय उत्साहाचा,दैवीशक्ति उपासनेचा हा नवरात्री उत्सव. पण गेल्या काही वर्षात ह्यात खूप बदल होत आहेत. त्यातल पावित्र्य नष्ट होत आहे.

दररोज साड्यांचे रंग कोणते असावे ह्याच्या जाहिराती वर्तमानपत्र वाचायचा मिळतात. त्याचेही मार्केटिंग सुरु होते. दुकानात त्या त्या रंगाची मागणी वाढू लागते.

एक वेगळे वळण सार्वजिक उत्सवाला येत आहे.तरुण मुलं-मुली नऊ-दहा दिवस गरबा, दांडीया खेळतात.काही ठिकाणी उत्थान ड्रेस असतात,उघड्या अंगावर गोंदवले असते,शरीर प्रदर्शन करणे टाळायला हवे. गरबा हा देवीला प्रसन्न करुन घेण्यासाठी खेळला जातो.. देवी विषयी श्रद्धा आणि विश्वास नसणारे बरेच लोक यात वेगळ्याच उद्देशाने सहभागी झालेले असतात. त्यावरही लक्ष द्यायला हवे.

डी.जे. कर्कश आवाजात गाणी.. .. रोषणाई ... दैवी उपासनेशी त्यांना घेणदेणं नसतं. फारस शुध्दस्वरुप ह्या खेळात राहिलं नाहीये अस नाईलाजाने म्हणावे लागते... अनेक ठिकाणी जे प्रकार घडतात ते आपण बघतो.वाचतो.ही सत्यपरीस्थीती नाकारता येणार नाही.

मागील काळात बघीतले तर स्त्री अत्याचाराच्या, बलात्काराच्या मानव जातीस काळीमा फासणाऱ्या, लाज आणणाऱ्या घटना आहेत.अजूनही बऱ्याच घटना शहरांबरोबर निमशहरी भागात घडतच असतात. एकीकडे नवरात्रात अनेक ठिकाणी विशेष कार्य करणाऱ्या, शौर्य गाजवणाऱ्या स्त्री शक्तिचा सन्मान केला जातो.नवदुर्गा म्हणून संबोधण्यात येते.आणि दुसरीकडे अश्या घटना. स्त्रियांनीही त्यांचे वरील अत्याचार थांबत नाहीत तोपर्यंत पुरुषांनकडून होणाऱ्या सन्मानावर बहिष्कार टाकावा.

नवरात्र हा शारिरीक व आत्मिक शुध्दतेचा काळ मानला जातो. पण त्याच काळात एकीकडे असे काही अपप्रकार घडत असतील,गुंडांन कडून, विकृत प्रवृत्ती कडून घडवून आणले जात असतील, तर हे थांबायला हवे.

स्त्री शक्तिचा आदर करायला हवा. हे आपणच करायला हवे ना. अनेक ठिकाणी विजया दशमीच्या दिवशी रावण दहनाचा कार्यक्रम असतो. हा कार्यक्रम एक इव्हेंट म्हणून

समजू नये, तर आज समाजात जी अपप्रवृत्ती वाढली आहे आणि अत्याचार होत आहेत तर अशा रावण वृत्तीचा नाश होणे आवश्यक आहे. रावण दहनाला काही अर्थ आहे. नुसते प्रतीकात्मक दहन नको.

नवरात्र उत्सवासाठी मंदिर दर्शनासाठी रोषणाई करुन सज्ज आहेत. ....दुर्गा उत्सव मंडळाच्या तयारीला अंतिम स्वरूप आले आहे. नवरात्रात अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. नवरात्रोत्सवातील नऊ दिवस ज्याला जशी जगात तशी उपासना करावी.

यावर्षी नऊ दिवसाचे पूर्ण नवरात्र व दशमीला दसरा विजयादशमी असा योग २७ वर्षानंतर आला आहे.अतिशय शुभकारक योग आहे असे म्हटले आहे तसेच तृतीया ही तिची दोन दिवस आहे त्यामुळे हा योगहीसामाजिक दृष्टीने शुभ आणि सुखकारक व समृद्धी देणार आहे.

आपण सगळ्यांनीच या शुभपर्वावर उपासना करून देवी दर्शन घ्यावे, दुष्ट शक्तीचा नाश व्हावा,राज्यातील जनता, सुखी, समाधानी व्हावी ही प्रार्थना करावी..... पवित्र आणि आनंदी वातावरणात नवरात्र आणि विजयादशमी साजरी करवी.

नवरात्री उत्सवाच्या सर्व हिंदू बांधवांना मनःपूर्वक शुभेच्छा.!!

# नवरात्रीच्या उपवासासाठी अचूक प्रमाणातील भाजणी

**ज्योतिर्मय साहित्य**

आता नवरात्राचे सर्वांना वेध लागले आहेत . घराघरातून साफसफाई, मंदिरात सजावट, रंगकाम, स्वच्छता करणे अशी धामधूम सुरु आहे. तर महिला एकीकडे घराचीदररोजची कामे तर सुरु आहेतच पण दुसरीकडे घराची स्वच्छता, सजावट, नवरात्रात घालायचे दागिने, साड्या पाहून त्याची तयारी, दांडिया गरबा यांची तयारी आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे नवरात्रीतील खाण्यापिण्याच्या गोष्टींची पूर्वतयारी करणे यात इतक्या बिझी झाल्या आहेत की जणू साक्षात अष्टभुजाच अवतरल्यासारखे वाटते. वेळ, दिवस पुरत नाहीत. यातील खाण्याच्या पूर्वतयारी मधील आज आपण एक गोष्ट बनवून ठेवू. बऱ्याच महिलांचे, पुरुषाचे सुद्धा नऊ दिवस उपवास असतात. फराळाचे विविध पदार्थ बनवले जातात. छान पोट भरणारी खमंग भाजणीची थालीपीठे, दशमी, धिरडे दमदार असतात त्यामुळे सर्वांनांच आवडतात. त्यासाठी जी भाजणी लागते ती आधी बनवून ठेवावी लागते. चला मग लगेंच सुरु करू.

साहित्य :

१ किलो भाजणी बनवण्यासाठी आपल्याला १ वाटी साबुदाणा, १ वाटी राजगिरा, दीड वाटी भगर, १ चमचा जिरे .

कृती :

प्रथम गॅसवर कढई ठेवून त्यात साबुदाणा मध्यम आचेवर लाही होईपर्यंत ४..५ मिनिटे भाजावा. लाही होऊन साबुदाणा हलका आणि पांढराशुभ्र होतो मग २ मिनिटे भाजवा







म्हणजे तो व्यवस्थित भाजला गेला आहे असे समजावे.नंतर तो खाली काढून मंद आचेवर राजगिरा भाजण्यास घ्यावा. तो मात्र मंद आचेवरच भाजावा कारण त्याच्या लाह्या होताना खुप तडतडतात त्यामुळे काळजी घ्यावी . राजगिरा मात्र थोडा थोडा ३..४ वेळा भाजावा म्हणजे लाह्या छान होऊन मस्त खमंग भाजला जातो . त्यानंतर भगर म्हणजेच वरई भाजायला घ्यावी. ही मंद आचेवरच शक्यतो भाजावी. अगदी थोड्यावेळच भाजावी. जास्त लाल भाजू नये. नाहीतर कडवटपणा येऊ शकतो. मग त्याच गरम कढईत जिरे घालून किंचीत गरम करावेत . स्वाद आला की गॅस बंद करून खाली काढावेत.

मग सर्व छान एकत्र करून मिक्सर मधून इजडम बारीक फिरवावे. नंतर चाळणीने चाळून ती थंड झाली की घट्ट झाकणाच्या डब्यात भरून ठेवावी. आयत्या वेळी याची थालीपीठे, धिरडे, पुऱ्या वगैरे बनवू शकतो. ही भाजणी ४..५ महिने छान टिकते.

वैशिष्ट्य:

या एकाच भाजणी पासून वेगवेगळ्या टेस्टचे

वेगवेगळे पदार्थ बनवु शकतो आणि ते पोटभरीचेही असतात. त्यामुळे दररोज वेगळे पदार्थ बनवल्याचे, खाल्ल्याचे समाधान पण मिळते. कधी उकडलेला बटाटा. तर कधी काकडी, कधी कोहाळे, लाल भोपळा वाफवून तिखट, मीठ, कोथिंबीर घालून थालीपीठे , पुऱ्या बनवू शकतो. आधी बनवून ठेवल्यामुळे आयत्यावेळी झटपट बनवू शकतो . अशा अचूक प्रमाणाने केलेली भाजणी हमखास सुरेख होतेच.



तुझ्या दर्शनाची आस

तुझ्या दर्शना ची लागलीसे आस
तुझ्या संगतीचा घडो सहवास ॥
"माहुरगडी ची तुच रेणुका
तुळजापूरवासिनी तुका
कोल्हापुरीची लक्ष्मी माता
वणी सप्तश्रृंगी गडी निवास" ।
"मातृतीथे हे माहुराचे
कल्लोळ बरवे तुळजापुरचे
भक्तांनाही मुक्ती मिळते
असे आहे येथे एक पापनाश" ।
"विष्णूदासा" प्रसन्न झाली
काव्य शक्ती जागृत केली
रेणुकामाऊली अवतरली
माहुरगडी असे निवास " ।
शिवभूपाला खडग देवूनी
महाराष्ट्री तुळजे कुलस्वामिनी
हिंदू सारा एक होऊनी
भक्त येती लोटांगणी
तुझ्या दर्शनास ।
गोंधळ घालिन तव नामाचा
मुजरा करीन मी मानाचा
उदोकार हा जय अंबेचा
यावे तू आई गोंधळास ।

कवी दुर्गादास दि.पळसकर पुणे
भ्रमणध्वनी क्र.७३८७९२३८९५



नऊ रंग..

नवरात्र महोत्सव
नऊ रात्र नऊ रंग
दिस हे मंतरलेले
उल्हसित अंतरंग
नारी सह पुरुषही
एक रंग एक संघ
गरबा न् दांडियात
खेळातहोतात दंग
वासनेचा ना स्पर्श
मन मोकळे उत्तुंग
अंगचट नको फुके
पोखरू नये रे भृंग
नर नारी न् नटेश्वर
स्वभावा उठे तरंग
गोपीसह निर्वासिना
नाचे निर्मळ श्रीरंग
भेदा भेद विरघळे
गळूनि पडती व्यंग
नारीत पाहे देवीला
रे आपपर भावभंग
वृत्तीहवी निर्विकार
देवते समान अवंग
फायदे घेत गर्दीचा
नको ते अतिप्रसंग

- हेमंत मुसरीफ, पुणे
9730306996.
www.kavyakusum.com

नव निर्मिती..

नवरात्र सण आगळा
जागवे ज्योती जागृती
नर नारी भेद विस्मृती
स्थापे महिला संस्कृती

जागरनाविन्यनिर्मीती
एक होता शिव शक्ती
पुजिती आदिमातेला
रे एकत्र येऊनि दंपती

स्त्रीशक्ती तव आकृती
दूर करे गं क्रूर विकृती
सिध्द ते महिलाश्रेष्ठत्व
जाणवे तुझी प्रतिकृती

महिशासूर वध करुनि
दाखवली सजग शक्ती
महिलांच्या धमन्यातही
सळसळती उर्जा रक्ती

तुटले दुःख साखळदंड
दिव्य शिखा धगधगती
नारी कमजोर अशक्त
अपप्रचारां मिळे मुक्ती

कळले सत्व अधिपती
वनिता स्थापली तख्ती
साक्षात्कार दे भगवती
जो करे मनातून भक्ती



शक्ती स्वरूप..

यज्ञात अर्पण केले स्वतः ला
शिव अपमान सोसला न सतीला..
पुन्हा जन्मली हिमालय पोटी
शैलपुत्री पूजन पहिल्या दिवसाला..
उजव्या हाती जपमाळ
आहे ती तपचारिणी..
नवरात्रीचे दुसरे रूप
पूजन ब्रह्मचारिणी..
शिरोभागी अर्धचंद्र
दशभुजा स्वरूप..
तिसऱ्या दिवशी पूजन
चंद्रघंटा माता रुप..
कोहळयाचा नैवेद्य जिचा
करते रोग हरण..
चौथ्या दिवशी होई
कुष्भांड देवी स्मरण..
कमळासना बैसली
शुभ्र वर्ण स्कंद माता..
नवरात्रीचे पाचवे रूप
मनोमनी पूजीले आता..
उत्पन्न झाली
कात्यक गोत्रात..
कात्यायनी पूजीले
साहाव्या रात्रीत..
काळे शरीर तीन डोळे
केशसंभार विखुरलेले..
खड्गधारीणी कालरात्रीस
सातव्या दिवशी पूजीयले..
गौर वर्ण आभूषणे ल्याली
वृषभावरी बैसली माता..
आठव्या नवरात्रीत गाते
महागौरी ची गाथा..

आठ सिद्धी प्राप्ती देते
मनोकामना पूर्ण करते..
वरदायिनी सिद्धयत्री
नवव्या दिवशी पूजन नवरात्री..
शक्ती साहसाचे प्रतिक
महिषासुरा संहारक..
शिवशक्ती स्वरूप
ब्रम्हांड नायक..

@ प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर



छत्रपती संभाजीनगरातील कर्णपुऱ्यातील कर्णिका माता देवीच्या गाभाऱ्याला चांदीचा मुलामा तयार करण्यात आला. शहराची ग्रामदेवता म्हणून कर्णिका माता देवीची ओळख आहे

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559